महाराष्ट्र जनशक्ती

ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सअॅप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) | वर्ष : तिसरे | अंक : ८० वे | दिनांक : १३/०३/२०२६ | वार : शुक्रवार

## जागतिक वारसा ठरलेल्या मराठा किल्ल्यांच्या जतनासाठी कृती आराखडा स्थापन करा



**मुंबई :** मराठा साम्राज्यातील १२ किल्ल्यांचा युनेस्कोच्या जागतिक वारसा यादीत झालेला समावेश हा संपूर्ण देशासाठी आणि विशेषतः महाराष्ट्रासाठी अभिमानास्पद आहे. हा ऐतिहासिक वारसा जपण्यासाठी सरकारने आता विशेष निधीची तरतूद करून व्यापक संवर्धन योजना राबवावी, अशी मागणी महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री आणि राज्यसभा खासदार अशोकराव चव्हाण यांनी आज संसदेत केली.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या पुढाकारातून महाराष्ट्रातील ११ तर तामिळनाडूतील एका मराठा किल्ल्याला नुकताच जागतिक वारसाचा दर्जा प्रदान करण्यात आला आहे. राज्यसभेत 'विशेष उल्लेख'च्या माध्यमातून हा मुद्दा उपस्थित करताना खा. अशोकराव चव्हाण म्हणाले की, छत्रपती शिवाजी महाराज यांच्या गौरवशाली वारशाचे प्रतीक असलेले रायगड, प्रतापगड, सिंधुदुर्ग आणि शिवनेरी यांसारखे किल्ले हे केवळ दगडांच्या भिंती नसून ते १७ व्या शतकातील भारताच्या लष्करी वास्तुकलेचे, सागरी शक्तीचे आणि प्रशासकीय दूरदृष्टीचे जिवंत पुरावे आहेत.

हा अमूल्य वारसा जतन करणे हे आपले कर्तव्य असून, या किल्ल्यांच्या संवर्धनासाठी स्वतंत्र आणि पुरेशा आर्थिक निधीचे वाटप करणे, पुरातत्व शास्त्राचा आधार घेऊन शास्त्रीय पद्धतीने किल्ल्यांची दुरुस्ती व पुनरुज्जीवन व्हावे, किल्ल्यांचा इतिहास आणि वास्तुकलेचे डिजिटल स्वरूपात जतन करावे, किल्ल्यांवर वारसा पर्यटन विकसित करून स्थानिक तरुणांसाठी रोजगाराच्या संधी निर्माण कराव्यात, अशी मागणी त्यांनी यावेळी केली.

मराठा किल्ले ऐतिहासिकदृष्ट्या तर महत्त्वाचे आहेतच; शिवाय स्थानिक समुदायांसाठी शाश्वत रोजगार निर्माण करण्याची मोठी क्षमता त्यात आहे. या वारशाचे रूपांतर 'सांस्कृतिक अभिमान आणि आर्थिक संधी' अशा एकात्मिक मॉडेलमध्ये करण्याची आवश्यकता त्यांनी विषद केली.

## माझ्यावर कुणाचाही दबाव नाही - जय पवार

**मुंबई :** माजी उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अपघाती निधनानंतर निर्माण झालेला संशयाचा धूर अद्याप शमलेला नाही. या प्रकरणातील 'डीजीसीए'चा प्राथमिक अहवाल नाकारणारे जय पवार यांच्यावर ही सत्य परिस्थिती दडपण्यासाठी कुणाचा दबाव आहे का? अशा चर्चांना उधाण आले होते. या पार्श्वभूमीवर, "माझ्यावर कुणाचाही दबाव नाही, पूर्ण माहितीनिशी पुढच्या आठवड्यात मी पत्रकार परिषद घेऊन सर्व काही स्पष्ट करणार आहे," असा मोठा खुलासा जय पवार यांनी आज केला.

अजित पवार ज्या दुर्दैवी विमानातून प्रवास करत होते, त्याच विमानात फ्लाईट अटेंडंट असलेल्या पिंकी माळी यांचेही निधन झाले होते. जय पवार यांनी आज माळी यांच्या कुटुंबीयांची भेट घेऊन त्यांचे सांत्वन केले. "पिंकी माळी यांच्या आईचे दुःख शब्दांच्या पलीकडचे आहे. हे दुःख सहजासहजी जाणारे नाही, मात्र आम्ही आता एक कुटुंब म्हणून एकमेकांची काळजी घेणार आहोत," असे भावूक उद्गार जय पवार यांनी यावेळी काढले.

जय पवार यांनी आपली पूर्वनियोजित पत्रकार परिषद अचानक पुढे ढकलल्याने राजकीय वर्तुळात उलटसुलट चर्चा सुरू झाली होती. आमदार रोहित पवार यांनीही जय पवारांवर कुणाचा तरी दबाव असल्याचा संशय व्यक्त केला होता. यावर स्पष्टीकरण देताना जय पवार म्हणाले, "माझ्यावर कुणाचाही दबाव नाही. केवळ अर्धवट माहितीच्या आधारे समोर येण्यात अर्थ नाही. मला या प्रकरणाची अधिक सखोल आणि अतिरिक्त माहिती गोळा करायची आहे. सत्य माहिती हाती आल्याशिवाय बोलणे योग्य ठरणार नाही, म्हणूनच पत्रकार परिषद पुढे ढकलण्याचा निर्णय आम्ही घेतला."

"मी पुढच्या आठवड्यात पत्रकार परिषद घेणार असून, माझ्या मनात असलेल्या सर्व शंका आणि वस्तुस्थिती महाराष्ट्रासमोर मांडणार आहे," असे जय पवार यांनी यावेळी सांगितले. अजितदादांच्या मृत्यूबाबत आणि विमान अपघाताच्या चौकशी अहवालावर त्यांनी आधीच असमाधान व्यक्त केल्याने, आगामी पत्रकार परिषदेत ते कोणता नवीन गौप्यस्फोट करतात, याकडे संपूर्ण राज्याचे लक्ष लागले आहे.

## शिवसेना आणि धनुष्यबाण कोणाचा? : ठाकरे - शिंदे गटाची 'फायनल राऊंड' साठी तयारी

**मुंबई :** गेल्या तीन वर्षांपासून महाराष्ट्राच्या राजकारणात धगधगत असलेल्या शिवसेना पक्ष आणि चिन्हाच्या वादाचा निकाल पुन्हा एकदा लांबणीवर पडला आहे. गुरुवारी सर्वोच्च न्यायालयात या प्रकरणाची सुनावणी पार पडली, मात्र पुढील सुनावणीसाठी अद्याप कोणताही 'मुहूर्त' निश्चित करण्यात आलेला नाही. दोन्ही बाजूंचा लेखी युक्तिवाद अभ्यासल्यानंतर सर्वोच्च न्यायालय पुढील तारीख जाहीर करणार असल्याने, या प्रकरणाचा सस्पेन्स आता अधिकच वाढला आहे.

गुरुवारच्या सुनावणीदरम्यान उद्धव ठाकरे गटाच्या वतीने ज्येष्ठ विधिज्ञ कपिल सिब्बल यांनी बाजू मांडली. दोन्ही गटांनी (ठाकरे आणि शिंदे) अंतिम युक्तिवादासाठी आपली तयारी दर्शवली आहे. मात्र, न्यायालयाने स्पष्ट केले की, या प्रकरणातील व्याप्ती मोठी असल्याने दोन्ही बाजूंचे लेखी मसुदे आधी अभ्यासले जातील आणि त्यानंतरच अंतिम सुनावणीसाठी वेळ निश्चित केली जाईल. पुढील तारीख सर्वोच्च न्यायालयाकडून नंतर कळवण्यात येणार आहे.

2022 मध्ये शिवसेनेत पडलेल्या उभ्या फुटीनंतर हा वाद सर्वोच्च न्यायालयात पोहोचला होता. निवडणूक आयोगाने फेब्रुवारी 2023 मध्ये 'धनुष्यबाण' चिन्ह आणि 'शिवसेना' हे नाव एकनाथ शिंदे गटाला दिले. या निर्णयाला उद्धव ठाकरे यांनी आव्हान दिले आहे. ही याचिका गेल्या तीन वर्षांपासून प्रलंबित असल्याने शिवसैनिकांमध्ये आणि राजकीय वर्तुळात निकालाबाबत मोठी उत्सुकता आहे. जून 2022: एकनाथ शिंदे यांच्यासह 40 आमदारांनी बंड पुकारल्याने महाविकास आघाडी सरकार कोसळले. त्यानंतर शिंदे गटाने भाजपसोबत मिळून सरकार स्थापन केले. फेब्रुवारी 2023: शिवसेना फुटीनंतर पक्षाचे नाव आणि चिन्हासाठी हा वाद निवडणूक आयोगाकडे गेला. निवडणूक आयोगाने मोठा निर्णय घेत 'धनुष्यबाण' चिन्ह शिंदे गटाला, तर ठाकरे गटाला 'मशाल' चिन्ह दिले. जानेवारी 2024: विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी शिंदे गटालाच 'खरी शिवसेना' म्हणून मान्यता दिली. या निर्णयालाही ठाकरे गटाने सर्वोच्च न्यायालयात आव्हान दिले असून त्याची स्वतंत्र सुनावणी सुरू आहे. मे 2025: सुप्रीम कोर्टाने निवडणूक आयोगाच्या निर्णयाला स्थगिती देण्यास नकार दिला. स्थानिक निवडणुकांमध्ये चिन्हाचा मोठा परिणाम होत नाही, असे मत सर्वोच्च न्यायालयाने व्यक्त केले होते. ठाकरे गटाने सर्वोच्च न्यायालयात असा युक्तिवाद केला आहे की, निवडणूक आयोगाचा निर्णय लोकशाही मूल्यांच्या विरोधात आहे. तसेच, राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाच्या निकालाचा दाखला देत, शिंदे गटालाही त्यांचे चिन्ह 'तात्पुरते' असल्याचे जाहीर करावे लागते का? यावरही चर्चा सुरू आहे. राज्यातील आगामी राजकीय समीकरणे आणि निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर सर्वोच्च न्यायालयाचा हा निकाल अत्यंत कळीचा ठरणार आहे. आता न्यायालय लेखी युक्तिवादाचा अभ्यास करून नेमकी कोणती तारीख देते, याकडे संपूर्ण देशाचे लक्ष लागले आहे.

बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.
कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.
संपर्क क्र. 7588005002

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शुक्रवार १३ मार्च २०२६

## जयभवानी महाविद्यालयाच्या युट्युब चॅनेलचे प्रकाशन संपन्न



**पाटोदा (प्रतिनिधी) :** जयभवानी शिक्षण प्रसारक मंडळाच्या पाटोदा येथील कला आणि विज्ञान महाविद्यालयाच्या अधिकृत युट्युब चॅनेलचे प्रकाशन प्राचार्य डॉ. विश्वास कदम यांच्या हस्ते उत्साहात संपन्न झाले. 'लॅपटॉप' वर चॅनेलचे 'पब्लिश' बटन क्लिक करून शिवाजीनगर, गढीच्या श्री. शिवाजीराव पंडित कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विश्वास कदम यांनी महाविद्यालयाचे हे युट्युब चॅनेल प्रकाशित केले. यानिमित्ताने आयोजित कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी पाटोदाच्या कला व विज्ञान महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सदाशिव सरकटे हे होते. प्रारंभी महाविद्यालयाच्या युट्युब - फेसबुक समितीचे प्रमुख प्रा. बापू घोक्षे, सदस्य प्रा. डॉ. कल्पना घारगे आणि प्रा. डॉ. प्रविण शिलेदार यांनी प्राचार्य डॉ. विश्वास कदम यांचे स्वागत केले. याप्रसंगी बोलतांना प्राचार्य डॉ. विश्वास कदम म्हणाले की, उच्च शिक्षणाच्या क्षेत्रात गुणवत्तापूर्ण शिक्षण, मूल्याधिष्ठित संस्कार आणि विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी कटिबद्ध असलेल्या पाटोद्याच्या जयभवानी महाविद्यालयाच्या विविध विभागांच्या उल्लेखनीय कामगिरीची माहिती, शैक्षणिक, सांस्कृतिक व सामाजिक उपक्रमांचे प्रसारण या चॅनेलच्या माध्यमातून होईल. याप्रसंगी महाविद्यालयाच्या गुणवत्ता हमी कक्षाचे समन्वयक प्रा. डॉ. विनोद किर्दक यांच्यासह महाविद्यालयाचे प्राध्यापक व कर्मचारी उपस्थित होते. प्रा. बापू घोक्षे यांनी प्रास्ताविक, डॉ. प्रविण शिलेदार यांनी आभार तर डॉ. कल्पना घारगे यांनी सूत्रसंचालन केले.



**आधुनिक महाराष्ट्राचे शिल्पकार आणि राज्याचे पहिले मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांची जयंती (१२ मार्च) बद्रीनारायण बारवाले महाविद्यालयात साजरी करण्यात आली. यावेळी डॉ. कविता प्राशर, डॉ. भूषण नाफडे, प्रा.संदीप पाटील, श्री. मकरंद कुलकर्णी, सुजाता नेटके**

१२ वी सायन्स व B.Sc. पास विद्यार्थ्यांसाठी

शासन मान्यताप्राप्त जॉबगॅरंटी कोर्सेस

DMLT
कालावधी २ वर्ष
पात्रता : १२ वी सायन्स

PGDMLT
कालावधी दिड वर्ष (३सेमिस्टर)
पात्रता : B.Sc. (Microbiology, Chemistry, Botany, Zoology, Biochemistry, MLT, CLS)

X-RAY
कालावधी १ वर्ष
पात्रता : १०वी ,१२ वी पास

C.T.SCAN
कालावधी १ वर्ष
पात्रता : १०वी ,१२ वी पास

E.C.G.
कालावधी १ वर्ष
पात्रता : १०वी ,१२ वी पास

O.T. TECHNICIAN
कालावधी २ वर्ष
पात्रता : १०वी ,१२ वी पास

PG RADIOLOGY
कालावधी दिड वर्ष (३सेमिस्टर)
पात्रता : B.Sc. Physics

रेडिओलॉजी
कालावधी २ वर्ष
पात्रता : १२ वी सायन्स पास

फिजिओथेरपी
कालावधी २ वर्ष
पात्रता : १२ वी सायन्स पास

ऑप्थोमेट्री
कालावधी २ वर्ष
पात्रता : १२ वी सायन्स पास

9405109103 | 8830838903

# करिअरच्या विविध संधींबाबत विद्यार्थिनींना मार्गदर्शन



**छत्रपती संभाजीनगर :** महिला दिनाच्या निमित्ताने डॉ. सौ. इंदिराबाई भास्करराव पाठक महिला कला महाविद्यालयात ‘करिअरच्या विविध संधी’ या विषयावर मार्गदर्शनपर व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले. दि. 11 मार्च (बुधवार) रोजी आयोजित या कार्यक्रमाला विद्यार्थिनींचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाच्या प्रभारी प्राचार्या डॉ. सुनीता बाजपाई होत्या. यावेळी विद्यार्थी संसद प्रमुख डॉ. सुनंदा चक्रनारायण, प्रमुख अतिथी म्हणून मौलाना आझाद कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयाच्या वाणिज्य विभाग प्रमुख डॉ. अपर्णा सराफ, मानसशास्त्र विभाग प्रमुख डॉ. रजनी सेनाड तसेच कनिष्ठ महाविद्यालयाच्या पर्यवेक्षिका प्रा. माधुरी भावसार यांची उपस्थिती होती.प्रमुख वक्त्या डॉ. अपर्णा सराफ यांनी आपल्या भाषणाच्या सुरुवातीला राष्ट्रीय व्हॉलीबॉलपटू अरुणिमा सिन्हा यांच्या जीवनातील प्रेरणादायी प्रसंग सांगितला. अपघातात पाय गमावूनही कृत्रिम पायाच्या साहाय्याने त्यांनी माऊंट एव्हरेस्ट सर करून जगातील पहिल्या दिव्यांग महिला गिर्यारोहक बनण्याचा मान मिळवला. जिद्द, चिकाटी आणि धैर्याच्या बळावर कोणतेही स्वप्न पूर्ण करता येते, असा प्रेरणादायी संदेश त्यांनी विद्यार्थिनींना दिला.त्यानंतर त्यांनी विद्यार्थिनींना शिक्षणानंतर उपलब्ध असलेल्या विविध करिअर संधींबाबत सविस्तर मार्गदर्शन केले. पारंपरिक क्षेत्रांबरोबरच नव्या आणि उदयोन्मुख क्षेत्रांमध्येही विद्यार्थ्यांसाठी मोठ्या प्रमाणावर संधी उपलब्ध असल्याचे त्यांनी सांगितले. विद्यार्थिनींनी आपल्या आवडीनुसार व क्षमतेनुसार योग्य क्षेत्राची निवड करावी. स्पर्धात्मक युगात यश मिळवण्यासाठी कौशल्य विकास, आत्मविश्वास आणि योग्य नियोजन यांना विशेष महत्त्व असल्याचे त्यांनी अधोरेखित केले.अध्यक्षीय समारोप करताना प्रभारी प्राचार्या डॉ. सुनीता बाजपाई यांनी सांगितले की, अशा प्रकारचे मार्गदर्शनपर कार्यक्रम विद्यार्थिनींच्या सर्वांगीण विकासासाठी आणि भविष्य घडविण्यासाठी अत्यंत उपयुक्त ठरतात. या कार्यक्रमातून विद्यार्थिनींना करिअरविषयी महत्त्वपूर्ण माहिती आणि प्रेरणा मिळाली आहे. विद्यार्थिनींनी आपले ध्येय निश्चित करून सातत्याने प्रयत्न करावेत तसेच उपलब्ध संधींचा योग्य उपयोग करून आपल्या भविष्यासाठी ठोस नियोजन करावे, असे त्यांनी आवाहन केले.कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी विद्यार्थी संसद प्रमुख डॉ. सुनंदा चक्रनारायण, डॉ. सरिता डापके आणि प्रा. अश्विनी शहाणे यांनी विशेष परिश्रम घेतले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कु. अमृता गायके (बी.ए. प्रथम वर्ष) हिने केले, तर प्रमुख पाहुण्यांचा परिचय कु. प्रतीक्षा गरड (बी.कॉम द्वितीय वर्ष) हिने करून दिला. आभार प्रदर्शन डॉ. सुनंदा चक्रनारायण यांनी केले.या कार्यक्रमास महाविद्यालयातील शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी तसेच विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## जिंतूर तालुक्यातील ग्रामसेवकांवर कारवाईचे निर्देश - पालकमंत्री मेघना बोर्डीकर



**जिंतूर (बी. डी. रामपूरकर) :** पंचायत समिती अंतर्गत कार्यरत ग्रामसेवक /ग्राम विकास अधिकारी आपल्या कार्याची नोंद वही दैनंदिनी सादर न करताच त्यांचा अलबेल कारभार चालत असल्याची माहिती उघडकीस आली आहे जिंतूर तालुक्यातील एकूण ६५ ग्रामसेवक पैकी ६३ ग्रामसेवक आपल्या दैनिक कार्याची नोंद न ठेवता अथवा दैनंदिनी सादर न करताच आपला कार्यभार करतात असे माहिती अधिकार कायद्या मुळे उघडकीस आले आहे या बाबत भाजप चे व्यापारी जिल्हा आघाडी चे जिल्हाध्यक्ष तथा पत्रकार यांनी जिंतूर चे गटविकास अधिकारी यांना ग्रामसेवक दैनंदिनी ची मागणी दि २९/७/२०२५ रोजी मागील दि १/४/२०२२ ते दि १/७/२०२५ कालावधीची मागणी केली होती परंतु दोन महिने उलटूनही पंचायत समिती कडून माहिती मिळाली नाही प्रथम अपिलार्थी म्हणून अर्ज केल्या नंतर गटविकास अधिकारी यांनी दि २४/१०/२०२५ रोजी १५ दिवसात माहिती देण्याचे आदेश देताच माहिती अधिकारी यांनी दि ७/११/२०२५ रोजी अशी माहिती दिली की एकूण ६५ ग्रामसेवक कार्यरत असून त्या पैकी तीन ग्रामसेवक जी ए पांढरे,यांची दि ६/८/२०२४श्रीमती के ए घुगे,यांची ३/२/२०२४ व जी एस साळवे यांची दि दि ४/५/२०२४ पर्यंत ची डायरी या तीन ग्रामसेवक यांनी वरील प्रमाणे दैनंदिनी सादर केली आहे त्याची माहिती सह डायरी दिली उर्वरित ६२ग्रामसेवक दैनंदिनी (डायरी) सादरच करीत नाही म्हणून कोकडवार यांनी दि ७/१/२०२६ पासून कार्यवाही ची मागणी केली परंतु पंचायत समिती स्तरावर दखलच घेतली गेली नाही म्हणून त्यांनी थेट परभणी जिल्हा पालकमंत्री मेघना बोर्डीकर साकोरे यांना दि १/३/२०२६ रोजी लेखी पत्र देऊन कार्यवाही ची मागणी केली असता पालकमंत्री यांनी जिल्हा परिषद मुख्यकार्यकारी अधिकारी परभणी यांना सदर प्रकरणाची तपासणी करून कडक कार्यवाही करावी असे आदेश दिले आहेत. एकंदर जिंतूर पंचायत समिती कार्यालयात कधीही कोणताही अधिकारी कर्मचारी कधीच टेबलवर जागेवर नसतात मुख्यालय ठिकाणी राहत नाहीत परिणामी शेतकरी नागरिक त्रस्त होताना नेहमी दिसून येतात.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शुक्रवार १३ मार्च २०२६


# पत्रकार भवनात दावत-ए-इफ्तार : जिंतूरमध्ये सामाजिक सलोख्याचे वातावरण



**जिंतूर (बी. डी. रामपूरकर) :** पवित्र रमजान महिन्याच्या निमित्ताने जिंतूर तालुका मराठी पत्रकार संघाच्या वतीने दरवर्षीप्रमाणे यंदाही दावत-ए-इफ्तार कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. शहरातील भाजी मंडी परिसरातील पत्रकार भवन येथे आयोजित या कार्यक्रमात विविध क्षेत्रातील मान्यवर, पत्रकार व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित राहून सामाजिक एकोपा व बंधुभावाचा संदेश दिला.रमजानच्या पवित्र महिन्यात रोजा सोडल्यानंतर आयोजित करण्यात आलेल्या या दावत-ए-इफ्तार कार्यक्रमात सर्व धर्मीय मान्यवरांनी एकत्रितपणे सहभागी होत सौहार्दाचे वातावरण निर्माण केले. यावेळी सेलू येथील उपविभागीय अधिकारी शैलेश लाहोटी, नायब तहसीलदार प्रशांत राखे, पोलीस निरीक्षक गजेंद्र सरोदे, जिंतूर नगराध्यक्ष प्रताप देशमुख, अॅड. मनोज सारडा, नगरसेवक इस्माईल पहलवान, डॉ. दुर्गादास कान्हडकर, प्रदीप चौधरी, अॅड. गोपाळ रोकडे, डॉ. इरफान पटेल, डॉ. जुनेद, टिका खान, जेष्ठ पत्रकार एम. ए. माजिद, निहाल अहमद, शेख शकील, अजमत पठाण, प्रभाकर लिखे, माजी सैनिक बालाजी शिंदे, बाळासाहेब काजळे यांच्यासह तालुक्यातील अनेक पत्रकार व मान्यवर उपस्थित होते.या कार्यक्रमाचे आयोजन जिंतूर तालुका मराठी पत्रकार संघाचे अध्यक्ष बालाजी शिंदे सोसकर, सचिव महेश देशमुख आणि कार्याध्यक्ष शिराज सिद्दिकी यांच्या पुढाकारातून करण्यात आले. कार्यक्रमादरम्यान उपस्थित मान्यवरांनी एकत्रितपणे इफ्तार करत परस्पर संवाद साधला आणि समाजात बंधुभाव, शांतता व ऐक्य टिकवण्याचा संदेश दिला.यावेळी उपस्थित मान्यवरांनी पत्रकार संघाच्या या उपक्रमाचे कौतुक करत अशा सामाजिक एकात्मता वाढविणाऱ्या कार्यक्रमांमुळे समाजात सकारात्मक वातावरण निर्माण होत असल्याचे मत व्यक्त केले. रमजानच्या पवित्र महिन्यात आयोजित करण्यात आलेल्या या दावत-ए-इफ्तार कार्यक्रमामुळे जिंतूर शहरात सामाजिक सलोखा व एकतेचे वातावरण अधिक दृढ झाल्याचेही उपस्थितांनी नमूद केले.

## जागरूक तुम्ही व्हावे!

पीक सोंगणीस येता,
रानामध्ये झाली गर्दी.
दिले वसंत ऋतुने,
पीक काढण्याची वर्दी.

चला चला दादा भाऊ,
शेत शिवारात जाऊ.
पीक काढता काढता,
गीत आनंदाचे गाऊ.
आले सुगीचे दिवस,
गाव चिडीचूप झाले.
शेत-शिवार भरता,
खेळ पाखरांचा चाले.

पीक काढता काढता,
तळहाती फोड आले.
उन्हा-तानात राबता,
सारे घामानेच न्हाले.

मायबाप विठ्ठलाचे,
मनोमनी जप केले.
पीक पिकता शेतात,
खळे भरुनिया गेले.

पीक जोमाने पिकता,
कसे कमी झाले भाव.
शेती मालाच्या भावाशी,
चाले दलालांचा डाव.

माल फुकट भावात,
बाजारात लुटतात.
महागाईच्या नावाने,
सारे टाळ्या कुटतात.

शेतकऱ्यांच्या मुलांनो,
जागरूक तुम्ही व्हावे!
लुटणाऱ्या दलालांना,
ओळखून तुम्ही घ्यावे.

हाती घेऊनी रुमणे,
जाब तुम्ही रे मागावे,
शेतकऱ्याच्या मालाचे,
भाव तुम्हीच लावावे.



**नागेश बोंतेवाड,**
**छत्रपती संभाजीनगर**
**मो. ९७६३२ ८३७०४**

# शरण पाटील यांची सहअध्यक्षपदी निवड



**धाराशिव (प्रा. सुधीर पंचगल्ले) :** मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शेतकऱ्यांच्या हितासाठी सुरू केलेली 'मुख्यमंत्री बळीराजा पाणंद रस्ते' ही अत्यंत महत्त्वाकांक्षी योजना आता उमरगा-लोहारा मतदारसंघात अधिक प्रभावीपणे राबविली जाणार आहे. या योजनेची अंमलबजावणी करण्यासाठी आणि प्रशासकीय कामात सुसूत्रता आणण्यासाठी मुख्यमंत्र्यांनी मतदारसंघनिहाय समित्या स्थापन करण्याचे निर्देश दिले होते. त्या अनुषंगाने राज्याचे महसूल मंत्री चंद्रशेखरजी बावनकुळे यांनी विशेष समिती गठीत केली असून, धाराशिव जिल्ह्याचे युवा नेते शरण बसवराज पाटील यांची उमरगा–लोहारा मतदारसंघासाठी सह-अध्यक्ष म्हणून नियुक्ती केली आहे. शरण पाटील यांनी यापूर्वीही मतदारसंघातील शेतकऱ्यांच्या व्यथा ओळखून 'शरण पाटील फाउंडेशन' च्या माध्यमातून स्वतःच्या खर्चातून पाणंद रस्त्यांचे मोठे जाळे उभे केले आहे. पावसाळ्यात शेतात जाण्यासाठी होणारी शेतकऱ्यांची मोठी अडचण दूर करून त्यांनी महत्त्वाची सुविधा उपलब्ध करून दिली होती. त्यांच्या या लोकहिताच्या कार्याची आणि प्रदीर्घ अनुभवाची दखल घेत, तसेच उमरगा–लोहारा मतदारसंघातील पाणंद रस्त्यांचा यशस्वी पॅटर्न संपूर्ण महाराष्ट्रभर राबविण्याच्या उद्देशाने त्यांची या सह-अध्यक्षपदी निवड करण्यात आली आहे.शेतकऱ्यांच्या दैनंदिन शेतीकामासाठी आणि शेतमाल बाजारपेठेपर्यंत विनासायास नेण्यासाठी हे पाणंद रस्ते अत्यंत महत्त्वाचे ठरणार आहेत. या समितीच्या माध्यमातून आता शासकीय स्तरावर अधिक गतिमान आणि प्रभावी काम होईल, असा विश्वास व्यक्त केला जात आहे. उमरगा–लोहारा मतदार संघस्तरीय समितीत शरण पाटील यांची निवड झाल्याबद्दल सर्व स्तरातून त्यांचे मनःपूर्वक अभिनंदन करण्यात येत असून पुढील सामाजिक कार्यासाठी त्यांना हार्दिक शुभेच्छा दिल्या जात आहेत


प्रवेश सुरू
बी.ए. मराठी व उर्दू माध्यम
एम.ए मराठी, हिंदी, इंग्रजी व उर्दू
बालसंगोपन
डीप्लोमा गांधी विचार
मानवी हक्क प्रमाणपत्र
संपर्क
9405109103


# नव्या युद्धासाठी

हे कविते
तुझ्यामुळे मनात पेटलेल्या
वेदनांच्या काहूराचा
करता आला निचरा
अन् सापडला जगण्याचा रस्ता

तू भेटली म्हणून
बोलता आलं बिनधास्त
अन् मांडता आलं
भोगलेलं दुष्काळी आयुष्यं
तेव्हा माझं रडगाणं झालं
गोड सुरेल गाणं

हे कविते
काळजातल्या ओल्या जखमा
उघडल्या तुझ्यापाशी
अन् धरली खपली
तुझ्या अमर शब्दांनी त्यावर

भिजल्या काही गोड ओळी अलगद
पापणीतून ओघळलेल्या आसवांनी

आता आभाळ आलंय दाटून
दुःखाचे ढग पसरले चोहुबाजुने
अन् पडला घनदाट काळोख

पण तुझ्या शब्दांच्या उजेडात
चालत राहतो मी
या नागमोडी वाटांवरून

१कारण माझ्यासाठी तू
शेवटची आशेची ज्योत आहेस

या जगण्याच्या वादळात
थकतोय मी आताशा
तेव्हा तुझ्याच शब्दांच्या कुशीत
विसावतो मी
अन् सज्ज होतो पुन्हा
उद्याच्या नव्या युद्धासाठी

**ज्ञानेश्वर गायके, कन्नड**


प्रवेश सुरू
डी.एम.एल.टी.
P.G.DMLT
फिजोओथेरिपी
डिप्लोमा ऑप्थोमेट्री
OT टेक्नीशियन
X-Ray, ECG
रेडीओलॉजी
संपर्क
9405109103



बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.
कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.
संपर्क क्र. 7588005002

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शुक्रवार १३ मार्च २०२६


## संयम, श्रद्धा आणि मानवतेचा संदेश देणारा पवित्र रमजान महिना - विशेष लेखमाला-२

### इस्लाम धर्मातील सर्वात पवित्र आणि महत्त्वाचा महिना म्हणजे रमजान

इस्लामी चांद्र दिनदर्शिकेतील नववा महिना असलेला रमजान हा केवळ उपवासाचा महिना नसून आत्मशुद्धी, संयम, दानधर्म आणि मानवतेचा संदेश देणारा आध्यात्मिक कालखंड मानला जातो. जगभरातील कोट्यवधी मुस्लिम बांधव या महिन्यात उपवास (रोजा) ठेवून अल्लाहची प्रार्थना करतात आणि स्वतःच्या जीवनात आध्यात्मिक शिस्त निर्माण करण्याचा प्रयत्न करतात.रमजान महिन्याची सुरुवात चंद्र दर्शनाने होते. चंद्र दिसल्यानंतर दुसऱ्या दिवसापासून रोजा सुरू होतो आणि संपूर्ण महिनाभर मुस्लिम बांधव पहाटेपासून सूर्यास्तापर्यंत अन्न व पाणी घेत नाहीत. या उपवासाला रोजा म्हणतात. पहाटे घेतल्या जाणाऱ्या भोजनाला सहरी (सेहरी) आणि सूर्यास्तानंतर रोजा सोडताना घेतल्या जाणाऱ्या भोजनाला इफ्तार म्हणतात.रमजानमधील रोजा हा केवळ भूक व तहान सहन करण्यापुरता मर्यादित नसतो. त्यामागे आत्मसंयम आणि आत्मशुद्धीचा मोठा संदेश आहे. या काळात वाईट विचार, चुकीचे कृत्य आणि नकारात्मक भावना यांपासून दूर राहण्याचा प्रयत्न केला जातो. संयम, शिस्त आणि अध्यात्मिकता वाढवण्याचा हा महिना मानला जातो. गरीब व गरजू लोकांच्या वेदना समजून घेण्याची जाणीवही या उपवासामुळे निर्माण होते.रमजान महिन्यात धार्मिक आचारांना विशेष महत्त्व दिले जाते. मुस्लिम बांधव दिवसातून पाच वेळा नमाज अदा करतात. तसेच कुरआनचे पठण करण्यावरही भर दिला जातो. रात्री मशिदींमध्ये विशेष नमाज तरावीह अदा केली जाते. अनेक ठिकाणी लोक एकत्र येऊन सामूहिक प्रार्थना करतात. या वातावरणामुळे समाजात आध्यात्मिकता आणि बंधुभाव वाढतो.रमजान महिन्यात दानधर्माला विशेष महत्त्व आहे. इस्लाम धर्मातील पाच मूलभूत कर्तव्यांपैकी एक म्हणजे जकात. आपल्या उत्पन्नातील ठरावीक हिस्सा गरीब आणि गरजू लोकांना देणे म्हणजे जकात. यामुळे समाजातील आर्थिक विषमता कमी करण्याचा प्रयत्न केला जातो. रमजान महिन्यात अनेक लोक गरजू कुटुंबांना अन्नधान्य, कपडे आणि आर्थिक मदत करतात. तसेच ईदपूर्वी गरीब लोकांना मदत करण्यासाठी फित्रा देण्याची परंपरा आहे.रमजान महिन्याचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे सामाजिक ऐक्य आणि बंधुभाव. इफ्तारच्या वेळी कुटुंबातील सर्व सदस्य एकत्र येतात. अनेक ठिकाणी सामूहिक इफ्तारचे आयोजन केले जाते. यात विविध धर्मांचे लोक सहभागी होतात. त्यामुळे समाजात परस्पर आदर आणि सौहार्द वाढण्यास मदत होते.आजच्या धकाधकीच्या जीवनात रमजान महिना माणसाला थांबून स्वतःकडे पाहण्याची संधी देतो. भौतिक सुखांच्या पलीकडे जाऊन आध्यात्मिक समाधान मिळवण्याचा मार्ग या महिन्यात दाखवला जातो. संयम, त्याग, दया आणि सहकार्य या मूल्यांची जाणीव या काळात अधिक ठळकपणे होते.रमजान महिन्याचा शेवट ईद उल फित्र या आनंदोत्सवाने होतो. संपूर्ण महिनाभर रोजा ठेवल्यानंतर चंद्र दर्शन झाल्यावर ईद साजरी केली जाते. या दिवशी मुस्लिम बांधव नवीन कपडे घालून मशिदीत विशेष नमाज अदा करतात. एकमेकांना मिठी मारून शुभेच्छा देतात आणि गोड पदार्थ वाटून आनंद साजरा करतात. ईद हा आनंद, प्रेम आणि बंधुभावाचा सण मानला जातो.आजच्या काळात धर्म, जात आणि पंथ यांच्या नावावर मतभेद निर्माण होण्याची उदाहरणे दिसतात. अशा वेळी रमजान महिना मानवतेचा आणि शांततेचा संदेश देतो. संयम, करुणा, दया आणि परस्पर सहकार्य या मूल्यांमुळे समाजात सकारात्मक वातावरण निर्माण होते.एकूणच पाहता रमजान हा केवळ धार्मिक विधींचा महिना नाही, तर माणसाला स्वतःच्या जीवनाकडे नव्या दृष्टीने पाहण्याची प्रेरणा देणारा कालखंड आहे. आत्मसंयम, दानधर्म, सामाजिक ऐक्य आणि मानवतेचा संदेश देणारा रमजान महिना समाजात शांतता आणि बंधुभाव वाढवण्यास महत्त्वाची भूमिका बजावतो.




**भगवंत पाळवदे**
**अंबाजोगाई**
**मो. ९९७५७ ०४३९१**


## 'जागतिक महिला दिना निमित्त रंगला..



**जालना (डॉ. राजेंद्र सोनवणे) :** जागतिक महिला दिनानिमित्त दि. ९ मार्च२०२६ रोजी जेईएस महाविद्यालय जालना येथे महिलासाठी दिनानिमित्त "ति" च्या अवकाशात स्त्रीत्वाची अनोखी गुंफण हा विशेष कार्यक्रम चुलीलाल गिरीलाल गोहेल सभागृहात महाविद्यालयाच्या वतीने कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. स्त्रियांचे सुखदु:ख, स्त्रियांचे जगणे आणि त्यांच्या मनातील भावनांना हक्काचे व्यासपीठ मिळवून देण्यासाठी जागतिक महिला दिनानिमित्त एक अनोखा कार्यक्रम जालना शहरात झाला. दैनंदिन आयुष्यात आपण जे अनुभवतो जे सोसतो ज्याचा पाठलाग करतो त्याच भावनांचे दर्शन या काव्य मैफिलीत झाले. छत्रपती संभाजीनगर येथील प्रिया धारूरकर यांनी स्त्रीच्या मनातील भावविश्व अतिशय सुंदर शब्दात मांडले. नागपूरच्या मनीषा अतुल यांनी स्त्रीचा संघर्ष आणि तिचा समाजातील स्थान यावर भाष्य केले. वसईच्या संगीता अरबूणे यांनी कविता मधून आई, घर आणि नात्यांमधील हळवेपणा थेट काळजाला भिडणारे वास्तव्य सुंदर शब्दात मांडले. या कार्यक्रमाचे अध्यक्षीय समारोप डॉ.मनीषा सुतार यांनी केला, अध्यक्षीय भाषणात समारोप प्रसंगी सांगितले की जालन्याच्या महिलांसाठी कार्यक्रम होणे गरजेचे असून, यामुळे महिलांचे प्रबोधन होते. हा कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी जेईएस महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ गणेश अग्निहोत्री यांनी विशेष परिश्रम घेतलेत. त्यांनी मार्गदर्शनही केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. डॉ रंजना येपूरवार तर आभार प्रदर्शन डॉ धनश्री देशपांडे यांनी केले.

या कार्यक्रमासाठी जालन्या-तील महिला आणि रसिक प्रेक्षकांची उपस्थिती मोठ्या संख्येने होती. तसेच महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## 'स्वामींची दशसूत्री' : प्रशासनातून उमलले माहेरपण... महिला सक्षमीकरणाचा अनोखा उपक्रम




**छत्रपती संभाजीनगर** :जिल्हा प्रशासनाच्या वतीने राबविण्यात येणाऱ्या 'स्वामींच्या दशसूत्री' उपक्रमाअंतर्गत आंतरराष्ट्रीय महिला दिनानिमित्त आयोजित करण्यात आलेला महिला सक्षमीकरण कार्यक्रम व माहेरपणाचा हळदीकुंकू समारंभ अत्यंत उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. या साठी श्रीमती सरला कामे जिल्हा परिषद प्राथमिक शाळा धोत्रा ता. सिल्लोड यांनी कृतज्ञता पत्र देत या कार्यक्रमामुळे प्रशासनाचे केवळ कार्यक्षमच नव्हे तर संवेदनशील आणि आपुलकीने परिपूर्ण असे रूप अनुभवायला मिळाले.महिला कर्मचाऱ्यांसाठी हा कार्यक्रम केवळ औपचारिक सोहळा नव्हता, तर माहेरपणाचा स्नेहपूर्ण अनुभव होता. माहेर म्हणजे मनमोकळेपणाने गाता-खेळता येणारे घर, रंगांची उधळण करता येणारे अंगण आणि आपल्या कलागुणांना दाद मिळवण्याचे स्थान. "भिऊ नकोस, मी तुझ्या पाठीशी आहे," असा आधार देणारे वातावरण या कार्यक्रमातून निर्माण झाले. जिल्हाधिकारी मा. दिलीप स्वामी यांनी महिला कर्मचाऱ्यांचे 'भाऊ' बनून हा माहेरपणाचा हळदीकुंकू कार्यक्रम आयोजित केला. प्रशासनाच्या चौकटीतही स्नेह, सन्मान आणि आपुलकीचे नाते निर्माण करता येते, हे त्यांनी कृतीतून दाखवून दिले.कार्यक्रमात महिला कर्मचाऱ्यांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला. कोणी गाणे सादर केले, कोणी अनुभव मांडले, तर कोणी आपल्या विविध कलागुणांची झलक दाखवली. प्रत्येक सादरीकरणाला मिळालेली दाद आणि शाबासकी यामुळे कार्यक्रम अधिक रंगतदार ठरला.या सोहळ्यात माध्यमिक शिक्षणाधिकारी अश्विनी लाटकर आणि प्राथमिक शिक्षणाधिकारी जयश्री चव्हाण यांनी मैत्रिणीप्रमाणे सहभागी होत महिला कर्मचाऱ्यांशी जिव्हाळ्याचे नाते जोडले. पदाचा दुरावा न ठेवता त्यांनी स्नेहाचा हात पुढे केला आणि त्यांच्या प्रेरणादायी शब्दांनी महिलांना त्यांच्या सामर्थ्याची नव्याने जाणीव करून दिली.यावेळी मुख्य कार्यकारी अधिकारी अंकित साहेब यांनीही महिलांच्या कर्तृत्वाचा गौरव करत समाज आणि प्रशासनाच्या प्रगतीसाठी महिलांना समान संधी आणि सन्मान मिळणे अत्यावश्यक असल्याचे अधोरेखित केले.या उपक्रमामुळे महिला कर्मचाऱ्यांच्या आत्म-विश्वासाला नवे बळ मिळाले. 'स्वामींची दशसूत्री' ही आता केवळ प्रशासनाची कार्ययोजना न राहता महिला सक्षमीकरण, संवेदनशील नेतृत्व आणि माहेरपणाच्या ऊबदार नात्याची ओळख बनली आहे.या प्रेरणादायी उपक्रमाबद्दल छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील सर्व महिला कर्मचारी वर्गाच्या वतीने श्रीमती सरला कामे व श्रीमती ललिता कामे यांनी जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांच्याप्रती मन:पूर्वक कृतज्ञता व्यक्त केली. या प्रसंगी जिल्हाधिकारी दिलीप स्वामी, मुख्य कार्यकारी अधिकारी श्री अंकित, मा,. शिक्षणाधिकारी अश्विनी लाठकर, मा. प्रा .शिक्षणाधिकारी जयश्री चव्हाण, विद्यानिकेतन प्राचार्य सुनीता राठोड, शैलजा दराडे, दीपाली थावरे, सीताराम पवार, गीता तांदळे, संगीता सावळे, आर. डी. महाजन, डॉ. विशाल तायडे, रमेश ठाकूर, सुनीता राठोड, कल्पना पदकोंडे, जयेश चौरे, दिलीप शिरसाठ, क्रांती धसवाडीकर, श्री. सकदेव, श्री. कापसे, श्री. उशीर, विद्या दीक्षित, मनीष दिवेकर, सुनीता वाघ, श्रीम. देशमुख, सुनील अदिक, आदी अधिकारी मान्यवर उपस्थित होते

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शुक्रवार १३ मार्च २०२६


## बोरीच्या जैन वाचनालयाच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा



**जिंतूर (बी.डी.रामपूरकर) :** ग्रंथालयांच्या क्षेत्रात कार्य करणाऱ्या 'ग्रंथालय भारती' या संस्थेतर्फे दिले जाणारे राज्यस्तरीय उत्कृष्ट ग्रंथपाल, उत्कृष्ट ग्रंथालय आणि उत्कृष्ट ग्रंथालय कार्यकर्ता पुरस्कार जाहीर करण्यात आले आहेत. बोरीच्या कै.जयकुमारजी जैन सार्वजनिक वाचनालयाचे ग्रंथपाल नेमिनाथ जैन यांना राज्यस्तरीय ग्रंथपाल पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे.संपूर्ण राज्यातून प्राप्त झालेल्या प्रस्तावांच्या छाननीनंतर निकष पूर्ण करणाऱ्या मान्यवरांची या सन्मानासाठी निवड करण्यात आली आहे. यामध्ये श्रीमती मंगला गोविंद पांडे उत्कृष्ट ग्रंथपाल पुरस्कार मुंबईच्या रामभाऊ म्हाळगी प्रबोधिनी (वडाळा) येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर अभ्यास केंद्राचे ग्रंथपाल दिलीप शिवराम नवेले आणि परभणी जिल्ह्यातील बोरी येथील कै. जयकुमारजी जैन सार्वजनिक वाचनालयाचे ग्रंथपाल नेमीनाथ जयकुमार जैन यांना जाहीर झाला आहे. तसेच सौ. साधना विनोद लोकरे स्मृती उत्कृष्ट ग्रंथालय पुरस्कारासाठी कोल्हापूर येथील जिल्हा 'अ' दर्जाच्या करवीर वाचन मंदिराची निवड करण्यात आली आहे. अमरावती जिल्ह्यातील रिद्धपूर येथील शहीद भगतसिंग सार्वजनिक वाचनालयाचे सचिव प्रदीप त्र्यंबकराव चौधरी यांना श्रीमती गुलाबबाई राधाकिसन बाहेती स्मृती उत्कृष्ट ग्रंथालय कार्यकर्ता पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहे. हे सर्व पुरस्कार रविवार, 15 मार्च 2026 रोजी नागपूर येथील श्रीराम सभागृहात दुपारी 4:00 वाजता आयोजित एका भव्य समारंभात प्रदान केले जातील. या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान ग्रंथालय भारतीचे केंद्रीय अध्यक्ष डॉ. राजशेखर बालेकर भूषविणार असून, ग्रामायण प्रतिष्ठानाचे अध्यक्ष अनिल सांबरे हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहतील. तसेच प्रसिद्ध स्तंभलेखक अमोल पुसदकर हे प्रमुख वक्ते म्हणून उपस्थितांना मार्गदर्शन करतील. या पुरस्कार वितरण सोहळ्याला ग्रंथप्रेमींनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन ग्रंथालय भारतीचे केंद्रीय कार्याध्यक्ष रवींद्र गोविंद पांडे, सचिव सुनील वायाळ, विदर्भ प्रांत अध्यक्ष डॉ. अभय टोंगो, संघटन सचिव राजेश राठोड, नागपूर महानगर अध्यक्ष प्रशांत तुंगार आणि सचिव विनय पंडे यांनी केले आहे.

## स्व. यशवंतराव चव्हाण यांचे साहित्य, कला- संस्कृती क्षेत्रातील योगदान सुसंस्कृत आणि वैचारिक पिढी घडविणारे



**मुरुम (प्रा. सुधीर पंचगल्ले) :** केवळ पायाभूत सुधारणा रस्ते, मोठे प्रकल्प उभारले म्हणजे विकास झाला असे म्हणता येणार नाही.त्याबरोबर समाज घडला पाहिजेम्हणुनच महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री आणि दूरदृष्टी असलेले नेते स्व. यशवंतराव चव्हाण यानी राजकारणाबरोबरच सामाजिक सांस्कृतिक आणि शैक्षणिक विकासासाठी लोककलांना प्रोत्साहन दिले. सांस्कृतिक कार्यक्रम, महोत्सव आणि कला स्पर्धा आयोजित करून लोककलांचा प्रसार केला.ग्रामीण भागातील कलाकारांना राज्यस्तरीय आणि राष्ट्रीय स्तरावर संधी उपलब्ध करून दिली.मराठी साहित्याचा विकास व्हावा म्हणून त्यांनी साहित्यिकांना प्रोत्साहन दिले. त्यांनी महाराष्ट्रातील लोककला, साहित्य आणि सांस्कृतिक परंपरा जपण्यासाठी मोठे योगदान दिले. त्यांच्या प्रयत्नांमुळे ग्रामीण कलाकारांना व्यासपीठ मिळाले आणि मराठी साहित्य व संस्कृतीचा विकास झाला. म्हणुन वैचारिक सुसंस्कृत समाज घडला असे प्रतिपादन प्राचार्य डॉ संजय अस्वले यानी केले. येथील श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालयात यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान मुंबई धाराशिव जिल्हा केंद्र, श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालय यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ अभ्यास केंद्र आणि वाणिज्य मंडळाच्या संयुक्त विद्यमाने स्व यशवंतराव चव्हाण यांच्या जयंतीनिमित्त महाराष्ट्राच्या लोककला आणि साहित्याच्या विकासातील योगदान या विषयावर व्याख्यान आणि लोकलला प्रकार याचे सादरीकरण उपक्रमाचे आयोजन संपन्न झाले. अध्यक्षीय समारोपात प्राचार्य डॉ अस्वले बोलत होते. प्रमुख वक्ते म्हणून मराठी विभाग प्रमुख आणि उपप्राचार्य डॉ पी ए पीटले यानी आपल्या मार्गदर्शनात यशवंतराव चव्हाण यांचे राजकीय आणि सामाजिक कार्य म्हणजे महाराष्ट्र यशवंत होण्यासाठी उचललेले मोठे पाऊल होते इतकेच नव्हे तर समाज विकासाचा पायाच तो होता. असे प्रतिपादन करताना विद्यार्थ्यांनी कला- संस्कृती साहित्य जोपासणे आणि वाचन संस्कृती अंगीकारण्याचे आवाहन केले. यावेळी प्रियांका इंगळे, सूरज उमरगेकर, वैष्णवी काळे, आरती सोनकांबळे, ज्योती धुमाळ, साईराज माने आदी विद्यार्थ्यांनी लोककला आणि संस्कृती याचे सादरीकरण केले.यावेळी अभ्यास केंद्राचे समन्वयक प्रा. प्रशांत साळुंके, डॉ अजित अष्टे, डॉ व्ही एन हिस्सल, डॉ एस पी. पसरकल्ले, डॉ ए के कटके, डॉ पी. डी पाटील, डॉ. बी जी माने, डॉ विजय मुळे, डॉ खंडू मुरळीकर, प्रा. ओमप्रकाश पवार, प्रा. विद्या गायकवाड, प्रा. अक्षता बिरादार प्रा राजूरकर, प्रा बनसोडे यांची उपस्थिती होती सूत्रसंचालन डॉ अष्टे, आणि आभार डॉ मुळे यानी केले.





